RNI : MHMAR/25/A0848 Shikshanastra@gmail.com 79722 12030 79722 12030

दैनिक
# शिक्षण अस्त्र

रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ ●अंक ५६● ● किंमत २ रू.● ● पाने 4 ● संपादक : संदिप नारायण ठाकरे

# आरटीई'तून बाहेर पडण्याचा नवा फंडा

## अल्पसंख्याक दर्जासाठी खासगी शाळांचा प्रयत्न

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : पुणे : 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009' (आरटीई) यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांच्या खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेशासाठी 25 टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. या प्रवेश प्रक्रियेसाठी 2018-2019 या शैक्षणिक वर्षात आठ हजार 980 शाळांमधून प्रवेशासाठी एक लाख 26 हजार 140 जागा उपलब्ध झाल्या होत्या. परंतु, शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये प्रवेशासाठी आठ हजार 649 शाळांनी नोंदणी केली असून, त्याद्वारे एक लाख 12 हजार 695 जागा आतापर्यंत उपलब्ध झाल्या आहेत. तूर्तास समोर आलेल्या आकडेवारीनुसार गेल्या नऊ वर्षात 331 शाळांची घट झाली आहे. आरटीईनुसार 25 टक्के राखीव जागांमधील प्रवेशाच्या 13 हजार 445 जागा कमी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) 25 टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडण्यासाठी आणि शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणातून सुटण्यासाठी आता राज्यातील अनेक विनाअनुदानित शाळा 'अल्पसंख्याक' म्हणून दर्जा मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. राज्यातील खासगी शाळांपैकी जवळपास 75 शाळांना अल्पसंख्याक शाळांचा दर्जा दिल्याची धक्कादायक बाब समोर आली. त्यातूनच 'आरटीई'च्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेतून आणि शिक्षण विभागाच्या अखत्यारीतून बाहेर पडण्यासाठी विनाअनुदानित शाळा राबवीत असलेला हा नवा फंडा समोर आला आहे.**

**राज्य सरकारच्या अल्पसंख्याक विभागाच्या 13 मे 2013 च्या शासन निर्णयानुसार, विनाअनुदानित धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक शाळांनी किमान 51 टक्के प्रवेश त्यांना प्राप्त झालेल्या दर्जाच्या गटातूनच भरावेत आणि उर्वरित जागा इतर गटातून भराव्यात, असा आदेश आहे. त्यानुसार संबंधित शाळांमध्ये 51 टक्के विद्यार्थी त्या भाषिक अल्पसंख्याक गटातील आहेत का, याची चौकशी करावी.**

**डॉ. शरद जावडेकर, कार्याध्यक्ष, अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा**

### 'अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्रकरणाची चौकशी करा'

शासकीय कार्यालयांना अधिकृत सुट्टी जाहीर केलेली असताना, अल्पसंख्याक विकास विभागातून शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्रे मंजूर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासकीय अधिका-यांनी सुट्टीच्या दिवशी घाईघाईने शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र का दिले? याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी विविध संघटनांकडून होत आहे. युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन म्हणाले, "अधिकृत सुट्टीच्या दिवशी शासकीय अधिका-यांनी एवढी कार्यतत्परता का दाखवली, या सर्व प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे आहे. या प्रकारामुळे मोठ्या आर्थिक आणि प्रशासकीय गैरव्यवहाराचा संशय निर्माण झाला आहे. शासकीय दुखवटा आणि कार्यालयीन सुट्टी असताना जवळपास 20 शिक्षण संस्थांच्या 75 शाळांना अल्पसंख्याक प्रमाणपत्रे मंजूर केल्याची बाब धक्कादायक आहे. यातून स्थगिती असताना मंजुरी कोणी आणि कोणत्या आदेशावर दिली, शासकीय दुखवट्याच्या दिवशी मंत्रालयात कोण सक्रिय होते, दोन

### घाई कशासाठी ?

1. 'आरटीई' नुसार प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडणे
2. विद्यार्थ्यांना 25 टक्के राखीव जागांवर प्रवेश देऊनही शासनाकडून वेळेवर शुल्क प्रतिपूर्ती न मिळणे
3. 'आरटीई' आणि शिक्षण विभागाच्या अखत्यारीतून सुटका मिळविणे

महिन्यांहून अधिक काळ एकही मंजुरी न देता, अचानक 75 शाळांना मंजुरी का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत."

आम आदमी पक्षाचे मुकुंद किर्दत म्हणाले, "खासगी शाळांना अल्पसंख्याक दर्जा देणे हा प्रकार धक्कादायक आहे. गेल्या काही वर्षात अनेक शाळांनी अल्पसंख्याक दर्जा घेतला आहे. या प्रकारात संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांना तत्काळ निलंबित करावे. 28 जानेवारीनंतर दिलेल्या सर्व अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्रांची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषींवर कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करावी, संपूर्ण प्रक्रियेचा पारदर्शक अहवाल जनतेसमोर लवकरात लवकर जाहीर केला जावा."

# राज्य सरकारचा निर्णय, विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन

## दहावी पास आदिवासी विद्यार्थ्यांना 2 वर्षे मोफत प्रशिक्षण मिळणार

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील अनुसूचित जमातीच्या (एसटी) विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने शुक्रवारी महत्त्वाचा शासन निर्णय घेतला आहे. दहावी उत्तीर्ण झालेल्या होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित खासगी संस्थांमार्फत अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) आणि वैद्यकीय (मेडिकल) प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन मिळणार आहे. यासाठी शासनाने 2 कोटी 92 लाख 18 हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास आदिवासी विकास विभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या डॉक्टर, इंजिनिअर होण्याच्या स्वप्नांना बळ मिळणार आहे.

आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे महागडे खासगी कोचिंग लावणे शक्य होत नाही. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारने ही योजना कार्यान्वित केली आहे. या अंतर्गत दहावी नंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी (11 वी व 12 वी) विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

### 480 गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणार

आदिवासी विद्यार्थ्यांना नीट, जेईई मोफत प्रशिक्षण देण्यात यावे यासाठी ट्रायबल फोरमने मागणी केली होती. शासनाने मागणीचा विचार करून 8 जून 2023 रोजी शासन निर्णय निर्मित केला होता. परंतु शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नव्हती. त्यानंतर मागील वर्षी या योजनेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

### इनसाइड स्टोरी

**ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी सांधण्याचा सरकारचा प्रयत्न**

या निर्णयातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना जेईई/नीटसारख्या परीक्षांचे 'कॉर्पोरेट' दर्जाचे प्रशिक्षण मोफत मिळणार असल्याने आदिवासी समाजातून भविष्यात डॉक्टर व इंजिनीअर घडण्यास मदत होईल.

# रोजगारासाठी स्थलांतर कोकणात विद्यार्थी संख्या घटली

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : पुणे : गेल्या दशकभरात दहावी व बारावीच्या परीक्षेला नोंदणी करणारे विद्यार्थी घटत असुन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच चांगल्या रोजगार संधीच्या शोधात होत असलेले स्थलांतर याला कारणीभुत ठरत आहे.

कोकण विभागीय मंडळातील विद्यार्थी संख्या कमी झाली आहे. घटलेला जन्मदराबरोबरच स्थलांतर हे विद्यार्थी संख्या कमी होण्याचे प्रमुख कारण आहे. बहुतांश मुले पुढील शिक्षण किंवा रोजगारासाठी प्रामुख्याने मुंबईला जातात. या भागात रोजगार निर्मिती झाल्यास हे स्थलांतर थांबु शकेल असे राजेश क्षीरसागर कोकण विभागीय मंडळाचे अध्यक्ष यांनी सांगितले.

स्वतःला प्रशिक्षित करा : मुंबई येथील मेळाव्यात मान्यवरांचे मत; ९०० शिक्षकांची उपस्थिती

# एआय शिक्षक व विद्यार्थ्यांना सक्षम करणारे

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्तेची वेगवेगळी साधने येत आहेत तस तशी विविध क्षेत्रातील कर्मचारी, तंत्रज्ञ आणि अधिकारी यांच्यात कुतूहल आणि भिती असे संमिश्र वातावरण आहे. यात भीतीची टक्केवारी अधिक आहे मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून शिक्षण, शेती, उद्योग, साहित्य, संगीत, चित्रपट निर्मिती, पत्रकारिता, दळण वळण पासून सर्वच क्षेत्रात बदल घडून येणार आहेत. यात शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या कामात देखील आमुलाग्रह बदल होणार असून असून हे सर्व बदल सकारात्मक होऊन शिक्षण आणि शिक्षक यांच्यावरील ताण कमी करून विद्यार्थ्याला शिक्षित होण्यासाठी अधिक सक्षम करणार आहे. यामुळे शिक्षण व्यवस्थेतील भेदभाव दूर होऊन, शिक्षण व्यवस्था ही समानतेच्या पातळीवर येणार आहेत.

शिक्षकांची कारकुनी कामे, विद्यार्थी ग्रेडिंग, पेपर तयार करणे, पेपर तपासणे, माहिती देणे ही कामे बाद होऊन, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास, त्याच्या सवयी, छंद आणि भावनिक समस्या आणि त्याच्यात असलेल्या विविध गुणवत्तेच्या आधारे विद्यर्थ्यांना मार्गदर्शन करणे, अशी भूमिका असणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी एआयची भीती भीती न बाळगता, त्यासाठी स्वतःला प्रशिक्षित करणे गरजेचे आहे, असे मत शिवसेनेचे प्रवक्ते किरण सोनावणे यांनी मुंबई येथील छबिलदास शाळेत आयोजित शिक्षक मेळाव्यात मांडले.



### सोहळ्यामध्ये शिक्षक वर्गाच्या कार्याचा सन्मान

मुंबई अध्यापक संघाच्या वतीने शिक्षक सन्मान आणि वार्षिक स्नेह मिलन सोहळ्यात किरण सोनावणे बोलत होते, मुंबई अध्यापक संघाचे अध्यक्ष अनिल बोरनारे हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी शिक्षण विकास मंचचे समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विशेष कार्य अधिकारी संतोष साखरे जनरल एज्युकेशन सोसायटी मुंबईचे कार्यवाह विकास पाटील चित्रपट व मालिका कलावंत अश्विन बोरनारे आंतरराष्ट्रीय कला दिग्दर्शक किशोर कदम आदी उपस्थित होते. तसेच या शिक्षक मेळाव्याला ९०० शिक्षकांची उपस्थिती लाभली.

### मुंबई कोकण शिक्षक महासंघाने केली घोषणा

अध्यापक संघाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी शिक्षक संघटना ही केवळ प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांसाठी सीमित न ठेवता सर्व क्षेत्रातील शिक्षकांचा एक मोठा महासंघ करण्याची महत्त्वपूर्ण अशी घोषणा केली.

यामध्ये आयटीआय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कला विद्यालय, विधी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय यासह सेल्फ फायनान्स शाळा व महाविद्यालये सीबीएसई आयसीएसई आयबी व अन्य आंतरराष्ट्रीय शाळांमधील अध्यापकांसोबतच मुंबई ठाण्यासह एम एम आर क्षेत्रातील सर्व महानगरपालिका नगरपालिका नगरपरिषद जिल्हा परिषद मधील शिक्षकांचा या महासंघात समावेश असेल, अशी घोषणा केली.
भीती न बाळगता स्वतःला प्रशिक्षित करणे गरजेचे...

---

# एप्रिलच्या परीक्षांच्या नियोजनाला शिक्षक संघटनांचा विरोध

## शाळांतील परीक्षा मार्चमध्येच घेण्याची मागणी

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : सीबीएसई मंडळाच्या पद्धतीनुसार शाळांच्या परीक्षा मार्चमध्ये घेऊन एप्रिलमध्ये शाळा सुरू करावी आणि मे महिन्यात विद्यार्थ्यांना सुट्टी द्यावी, अशा सूचना मागील वर्षी शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना दिल्या होत्या. मात्र आता हा निर्णय बदलून एप्रिलमध्येच परीक्षा घेण्याचे नियोजन शालेय शिक्षण विभागाने केले आहे. मात्र राज्यात एप्रिलमध्ये वाढणा-या उन्हाच्या पार्श्वभूमीवर शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध केला आहे.

शाळांतील परीक्षा मार्च महिन्यात पूर्ण करून एप्रिलमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि त्यांची जूनच्या पहिल्या आठवड्यात पुनर्परीक्षा घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत राज्य सरकारकडून मागील वर्षी नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार गतवर्षी खासगी अनुदानित, अनुद विनाअनुदानित शाळांमधील परीक्षा एप्रिलच्या सुरुवातीला संपविण्यात आली. त्यानंतर 25 एप्रिलपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेत बोलविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना कडाक्याच्या उन्हाचा सामना करावा लागला नाही, तसेच शिक्षकांनाही निकाल तयार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला. परिणामी विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापकांवरील ताण कमी होण्यास मदत झाली.

> "एप्रिलमध्ये परीक्षा घेण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व शिक्षकांच्या कामकाजाचा विचार न करता घेण्यात आलेला आहे. कडाक्याच्या उन्हात विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास भाग पाडणे हे अन्यायकारक असून यामुळे उपस्थिती व शैक्षणिक प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.
>
> तानाजी कांबळे, अध्यक्ष, महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना

मात्र यंदा राज्यातील सर्व शाळांमध्ये वार्षिक परीक्षा एप्रिलमध्ये घेण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या तयारीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच शिक्षकांनाही पेपर तपासणे व निकाल तयार करण्यासाठी फार कमी वेळ मिळत आहे. हे नियोजन विद्यार्थ्यांच्या आरोग्यास घातक ठरणार असून शैक्षणिक व्यवस्थेवरही विपरीत परिणाम होण्याची भीती शिक्षक संघटनांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे मार्चमध्ये वार्षिक परीक्षा पूर्ण कराव्यात, एप्रिलमध्ये मार्गदर्शन वर्ग घेण्यात यावेत, तसेच परीक्षा नियोजनाचे अधिकार पूर्वीप्रमाणे मुख्याध्यापकांना द्यावेत, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे मार्चमध्ये परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी मुंबई उत्तर विभागाचे उपाध्यक्ष व शिक्षक जयंत गायकवाड यांनी केली आहे.

---

# चौथी, सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा नोंदणीबाबत उदासीनता

## शाळांनी 100 टक्के उद्दिष्टपूर्तीच्या सूचना

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : पुणे : राज्य परीक्षा परिषदेतर्फे यंदा पाचवी व आठवी या इयत्तांसह चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठीही शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अनेक शाळांनी नोंदणी केलेली नाही, विद्यार्थ्यांचे अर्ज ही भरले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे आढावा बैठकीमध्ये चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठीच्या विद्यार्थी संख्येबाबत शालेय शिक्षणमंत्री, शिक्षण आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर, राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी शाळांना नोंदणी वाढविण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. त्यात म्हटले आहे, सरल संकेतस्थळानुसार नोंद असलेल्या अनेक शाळांनी या परीक्षेकरिता नोंदणी केलेली नाही किंवा विद्यार्थी आवेदनपत्रही भरलेले नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, महापालिकांच्या शाळांतील 100 टक्के विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज भरण्याबाबतच्या लेखी सूचना द्याव्यात,' असेही परिपत्रकात नमूद केले आहे. ही परीक्षा 26 एप्रिल रोजी होणार असून 13 फेब्रुवारीपर्यंत अर्जाची मुदत होती. आता परीक्षा परिषदेने 28 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

### शिक्षकांच्या कामाचे मूल्यांकन

शिष्यवृत्ती परीक्षा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना बंधनकारक आहे. या परीक्षेच्या आधारे सर्व शासकीय शाळांतील शिक्षकांचे मूल्यांकन करून त्याची नोंद शिक्षकांच्या सेवा पुस्तकात, गोपनीय अहवालात करण्यात येणार असल्याची तंबी देण्यात आली आहे.

# दहावीच्या मराठी पेपरला 102 केंद्रांवर 512 विद्यार्थी गैरहजर

## जालना जिल्हयात दहावीची परीक्षा सुरळित सुरू

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : जालना : जिल्हात 102 केंद्रांवर दहावीची परीक्षा शुक्रवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवशी मराठीच्या पेपरला प्रविष्ट 29 हजार 168 पैकी 28 हजार 656 विद्यार्थ्यांनी पेपर सोडवला. 512 जण गैरहजर राहिले. संवेदनशीलसह सर्वच केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा व्हावी. यासाठी वर्गात व बाहेरील बाजूस सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते.

शिवाय विद्यार्थ्यांनाही कॉपीमुक्त अभियानाबाबत अवगत करण्यात आले होते. चार संवेदनशील व 3 पद्रवी केंद्रांवर ड्रोन कॅमे-याची नजर



ठेवण्यात आली. त्याचा एआय ॲक सेस थेट जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षात देण्यात आला होता.

कॉपी करताना आढळल्यास विद्यार्थी, पर्यवेक्षक व केंद्रचालकांना जबाबदार धरून कारवाई केली जाईल. प्रसंगी कॉपीस सहकार्य करणा-यावर गुन्हा दाखल केला जाईल. सेवेतून निलंबितही केले जाईल, असा इशारा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला होता व तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी वैयक्तीकपणे काही परीक्षा केंदावर भेटी देवुन सर्व व्यवस्था पत्यक्ष पाहतांना दिसुन येत आहेत. याचाच परिणाम म्हणून पहिल्या दिवशी कुठेही कॉपी आढळून आली नाही, दरम्यान, 20 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत या परीक्षा होणार आहेत. कॉपी रोखण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर 2 अधिकारी-कर्मचा-यांची बैठे पथके व 6 भरारी पथके तैनात करण्यात आली.

माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात यांनी कॉपी मुक्तीच्या केलेल्या आवाहनाला सर्व जालना जिल्हयातील शाळांनी चांगला प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

जालना जिल्हयातील काही शाळा कॉपी साठी बदनाम होत्या त्यांचावर अंकुश ठेवण्याचे काम नागरिकांना दिसुन येत आहे.

# केंद्रप्रमुख शंकरराव देशपांडे यांना अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मान

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : जालना : राज्यातील 14 पचांहत्तरी पार केलेल्या सेवानिवृत्त शिक्षकांचा अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मान केला जाणार आहे. 23 फेब्रुवारी रोजी सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात हा गौरव केला जाणार आहे. यात जालना जिल्हातील भोकरदन तालुक यातील केंद्रप्रमुख शंकरराव देशपांडे हे मानकरी ठरले आहेत. याबद्दल त्यांचा सर्वस्तरातून गौरव केल्या जात आहे. राज्यातील जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील सेवानिवृत्त झालेल्या व पंचाहत्तरी पुर्ण केलेल्या शिक्षकाचें महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती निवड समिती अध्यक्ष विजयकुमार बहाकर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दार दिली आहे. सेवेत कार्यरत असतानाही इमानेइतबारे अध्यापनाचे कार्य करुन सेवानिवृत्तीनंतरही प्राथमिक शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करीत असल्याने अशाना सेवानिवृत्त शिक्षक संघटणेच्या वतीने अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मान देऊन गौरव करण्यात येणार आहे. निवडीबद्दल अभिनंदन : सर्व स्तरान अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मानासाठी मुंबई, जळगाव, रायगड, भिवंडी, सोलापूर, रायगड, जालना, अकोला, पालघर जिल्हातील मानकरी ठरलेले आहेत. सदर निवडीबद्दल अभिनंदन करण्यात आले आहे.

# मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयास 'अ +' दर्जा प्राप्त

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा: जालना : शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण ( Academic and Administrative Audit - AAA) 2025-26 अंतर्गत 'A+' दर्जा बहाल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 च्या कलम 117 (अ) व (ब) अन्वये नियुक्त समितीच्या शिफारशीनुसार महाविद्यालयाचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनात महाविद्यालयाने 450 पैकी 380 गुण मिळवत 'A+' श्रेणी संपादन केली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.



के. बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तापूर्ण अध्यापन, सक्षम प्रशासन, संशोधनवृत्ती, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम तसेच उत्कृष्ट पायाभूत सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. याच सातत्यपूर्ण गुणवत्ता-वृद्धीच्या प्रयत्नांचे फलित म्हणून महाविद्यालयास हा मानाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी आरोग्यमंत्री मा. श्री. राजेश टोपे, संस्थेच्या सचिव सौ. मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सहायक प्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर, प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य प्रा. आर. एल. करवंदे, कार्यालयीन अधीक्षक श्री. शाम भोजने, सर्व विभागप्रमुख, पदाधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

भविष्यातही शैक्षणिक उत्कृष्टतेचा हा दर्जा कायम राखण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# जालना शहरातील चित्रपट व मनोरंजनात्मक आकर्षन












# आचार्य प्रतिभा पुरस्काराने शंकर वैद्य सन्मानित

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : प्रतिनीधी जालना : MIT- ADT युनिव्हर्सिटी, लोणी काळभोर, पुणे यांच्या तर्फे शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-या प्राध्यापक व शिक्षक यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. शंकर वैद्य संचालक संकल्प सायन्स अकॅडमी जालना यांना आचार्य प्रतिभा पुरस्कार उल्लेखनीय कामगिरी बद्दल देण्यात आला. शिक्षण क्षेत्रामध्ये नवीन उपक्रम राबवून विद्यार्थांना नवीन दिशा मिळावी या साठी समाजातील प्राध्यापक व शिक्षक यांनी नवीन उपक्रम राबवत शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहचलं पाहिजे. यासाठी प्रेरणा देणारा हा पुरस्कार आहे. असे मत या वेळी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ.मंगेश कराड यांनी व्यक्त



केले. यावेळी डॉ. प्रा. सुशीलकुमार चावळे, डॉ. सविता शिंदे, राजेश एस., डॉ. ज्ञानदेव निलवर्ण डॉ. उल्हास मालवदे या मान्यवरांच्या उपस्थिती होती.

यावेळी प्रा. शंकर वैद्य म्हणाले, हा केवळ माझा वैयक्तिक सन्मान नाही तर माझ्या प्रिय विद्यार्थ्यांच्या कष्टांचा जिद्दीचा आणि यशाच्या प्रवासाचा गौरव आहे, हा पुरस्कार मी मनापासून माझ्या प्रिय विद्यार्थ्यांला त्यांच्या स्वप्नावर विश्वास ठेवणा-या पालकांना आणि शिक्षणावर ती निष्ठा ठेवणा-या प्रत्येक घटकाला समर्पित करीत आहे, विद्यार्थ्यांची मेहनत पालकांचा विश्वास आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर हे यश शक्य झाले आहे, हा पुरस्कार आम्हा सर्वांसाठी अधिक जबाबदारीने प्रामाणिकपणे आणि गुणवत्तेने शिक्षण देणारी ची प्रेरणा आहे.

माझे सहकारी शिक्षक आणि आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच शिक्षणातून उज्वल भविष्याकडे घडवण्याचा संकल्प अधिक दृढ झाला आहे. सर्व विद्यार्थी व पालकांचे मनःपूर्वक आभार शिक्षकांप्रती आपला विश्वास हाच आमचा खरा पुरस्कार आहे

# 'धमाल चिमण पाखरांची' वार्षिक स्नेहसम्मेलंनात मिळाली सांस्कृतिक मेजवानी..!

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : भोकरदन / प्रतिनिधी: जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, देहेड येथे बुधवारी (दि.18) आयोजित करण्यात आलेल्या 'धमाल चिमण पाखरांची' या सांस्कृतिक कार्य क्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या बहारदार कलाविष्काराने प्रेक्षकांना तब्बल चार तास मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक गणेश वंदनेने करण्यात आली. उद्घाटन जि. प. सदस्या आशाताई मुकेश पांडे, तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी भरत वानखेडे, एस. बी. नेव्हार, चेअरमन संतोष इंगळे, सरपंच वेणूताई निकाळजे, शिक्षण विस्ताराधिकारी बी. एल. बडगे, तालुकाध्यक्ष सुनील गिरणारे,



आर. एस. सोनवणे व केंद्रप्रमुख डी. पी. वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी 'इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड', छत्रपती संभाजीनगर या कंपनीच्या सीएसआर निधीतून व आशाताई मुकेश पांडे यांच्या प्रयत्नातून शाळेस सुमारे सहा लाख रुपयांचे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, देहेडतर्फेही सुमारे पन्नास हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य व भौतिक सुविधा देण्यात आल्या. कार्यक्रमास पंचक्रोशीतील मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जिजा वाघ यांनी केले, तर आभार संजय वाघ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभू बावस्कर, पोलीस पाटील वर्षा रवींद्र बावस्कर, उपाध्यक्ष सादिया बी. शाहीन शहा, समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, तसेच दीपक ठाकरे, सुभाष जंजाळ, देविदास भानुसे, गीता जाधव, पवन माळी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कवी दशरथ बावस्कर, माधव बावस्कर व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# 5 वी व 8 वी शिष्यवृत्ती च्या 20 केंद्रावर आज परीक्षा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : जालना / प्रतिनिधी: महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे या तर्फे आयोजित पूर्व उच्च पाथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 5 वी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा 22 फेब्रवारी 2026 रविवार रोजी संपूर्ण महाराष्ट्र त एकाच वेळी घेण्यात येत आहेत.

या परीक्षे करीता एकुण 20 परीक्षा केंद्राची निवड करण्यात आली आहे. 5 वी साठी 10 केद तर 8 वी साठी 10 केंद्र निवडण्यात आली आहे.

5 वी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता जालना शहरातील संस्कार प्रबोधिनी विद्यालय, सी.टी.एम.के गुजराती, विद्यालय, श्री.म.स्था.जैन हायस्कुल, सेंट मेरी हायस्कुल, श्री सरस्वती भुवन प्रशाला, जि.प.प्रशाला मुलांची, ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल तर ग्रामिण मधुन जि.प.प्रशाला नेर,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे विद्या गुरूणां गुरुः।

इ. 5 व 8 वी शिष्यवृत्ती परीक्षा

जि.प.प्रशाला सावरगाव हडप व जि.प.प्रशाला सेवली हे केंद आहेत.

8 वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जालना शहरातील राष्ट्रीय हिंदी विद्यालय, उर्दु हायस्कुल, सेंट जॉन्स हायस्कुल, श्री शिवाजी हायस्कुल रामनगर, नवयुवक पा.शाळा, कै.नदकिशोर सहानी माध्यमिक विद्यालय, एम.एस.जैन इंग्लिश स्कूल, जि.प.कन्या प्रशाला या केंद्राची निवड करण्यात आली आहे. तर गामिण मधुन अभिजात विद्यालय नेर फक्त एक केंद्र दिसुन येत आहे.

सदर परीक्षेकरीता 24 विद्यार्थ्यांवर एक पर्यवेक्षकाची नियुक्ती असुन तसेच ज्या परीक्षा केंदावर 300 पेक्षा जास्त विद्यार्थी आहेत तेथे उपकेंद सचालकांची नियुक्ती गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांच्या पत्रांन्वये करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर परीक्ष दोन सत्रात आयोजित केली असुन पहिल्या सत्र 11 ते 12.30 मध्ये प्रथम भाषा व गणित यावर 150 गुणांसाठी 75 प्रश्न तर दुसरे सत्र 2 ते 3.30 दरम्यान तृतीय भाषा व बुध्दीमत्ता चाचणी 150 गुणांसाठी 75 प्रश्न असे परिक्षेचे स्वरूप आहे.

परीक्षार्थींना 10 वाजता केंदावर राहण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. परीक्षार्थींनी दोन्ही पेपर पुर्वी 30 मिनीटे अगोदर प्रवेश पत्रासह उपस्थित राहण्याच्या सुचना पवेशपत्रावर देण्यात आलेल्या आहेत. निळा किंवा काळा बॉल पॉइन्ट पेन वापरण्याची मुभा आहे.

# मनपा मुर्गी तलाव शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी



शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : भोकरदन / प्रतिनिधी : जालना येथील मुर्गी तलाव परिसरातील महानगरपालिकेच्या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. रेखा गायकवाड यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका अख्तर जहाँ कुरैशी, अब्दुल वहीद जावेद, शिरीन समीना, ज्योती वाघ, रईसा बी आदी उपस्थित होते.

Publisher and Owner Sandeep Narayan Thakre Printer Santosh Vishnu Bhutekar at Jagmitra offset, Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna 431203 ( Maharashtra ) Place of publication office Daily Shikshan Astra, Plot No.11, Varsha Niwas, Sukh-shanti Nagar Mantha Road, Jalna. 431203 ( Maharashtra ) Editor : Sandeep Narayan Thakre, 7972212030 RNI **MHMAR/25/A0848 Email. Shikshanastra@gmail.com Advisory Body Adv.Adinath Kadam & Adv.Yogesh Somani,** . हे पत्र प्रकाशक, मालक

संदिप नारायण ठाकरे यांनी मुद्रक संतोष विष्णु भुतेकर यांच्या जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजीनगर, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे छापुन दैनिक शिक्षण अस्त्र, कार्यालय प्लॉट नं 11, वर्षा निवास, सुख शांती नगर, मंठा रोड, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले आहे. संपादक ः संदिप नारायण ठाकरे या अंकात प्रसिध्द झालेले मजकुर लेख व त्यामधुन होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. सर्व वाद जालना न्यायालया अंतर्गत आर एन आय MHMAR/25/A0848 कायदेशीर सल्लागार ः ॲड.आदिनाथ राम कदम व ॲड.योगेश गणेश सोमाणी